# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ३३९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—२०/०६/२०१६.

**१) पेट्रोलपंपवर काम करणाऱ्यांना मारहान करून खुर्च्यांची व इतर सामानाची ताडफोड करून जबरीने खिशातील पैसे हिसकावुन नेले. :—**

दिनांक १८/०६/२०१६ रोजी २२.३० वा. दरम्यान दोन्ही आरोपी हे दोन मोटार सायकलने कौशल्या ऑटो मोबाईल पंट्रोलपंप माडगी येथील पेट्रोलपंपवर जावुन फिर्यादी प्रदिप सुखदेव बिसने वय ३३ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड देव्हाळी यांना पेट्रोल मागितले. ''पेट्रोल पंप बंद झाल्याने पेट्रोल देता येणार नाही.'' असे फिर्यादीने आरोपीतांना म्हटले यावरून आरोपींनी फिर्यादीला व त्यांच्या सोबत पेट्रोल पंपवर काम करणाऱ्या इतर दोन सोबतींना फायबर खुर्च्यानीं व हाथाबुक्कयानी मारुन जखमी केले व फिर्यादीच्या खिशातील ६५०/—रु. जबरीने हिसकावुन फायबर खुर्च्यांची व मातीच्या मडक्याची तोडफोड करुन अंदाजे २००/—रु. चे नुकसान केले. असे फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३९५,३२३,४२७ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनि. हावरे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. सदर गुन्हयातील दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली.

**२) ट्रॅक्टरच्या चाकाखाली येवुन इसमाचा मृत्यु. :—**

दिनांक १८/०६/०१६ रोजी १७.०० वा. दरम्यान मृतक आरोपी याने उभ्या असलेल्या सोनालीका ट्रॅक्टर क्र. एमएच ३६ एल ६८२ व ट्रॉली क्र. एमएच ३६ जी ८४२ हया ट्रॅक्टर ला लागलेली चाबी डिझेल चेक करण्याकरिता काढीत असतांना अचानक ट्रॅक्टर सुरु होवुन जोरात पुढे गेला व धडक लागुन ट्रॅक्टरच्या चाकाखाली येवुन ट्रॅक्टरचे चाक अंगावरुन गेल्याने गंभीर जखमी होवुन मरण पावला. असे फिर्यादी नजीर हरिभाऊ बांते वय ३२ वर्ष, रा. सालेबर्डी यांचे तोंडी रिपोर्ट व डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३०४(अ) भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोउपनि. आळे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**३) मुलीला अश्लिल शब्दात शिवीगाळ करून विनयभंग केला व मारहान करून धमकी दिली. :—**

दिनांक १८/०६/०१६ रोजी १७.०० वा. दरम्यान आरोपीने फिर्यादी मुलगी वय १८ वर्ष, हीच्या भावाला ''तु ५००/—रु. घेवुन जा.'' असे बोलुन फिर्यादी मुलीविषयी सार्वजनीक ठिकाणी अश्लील शब्दात उच्चारले, यावरून फिर्यादी ही आरोपीला हटकण्यास गेली, तेव्हा आरोपीने फिर्यादीचा अपमान करण्याच्या उद्देशाने तिचा गळा धरुन तिला खाली पाडुन विनयभंग करून तिला थापड बुक्यानी मारपीट केली व मारण्यापिटण्याची धमकी दिली. असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३५४,२९४,३२३,५०६ भादंवि सहकलम ३(१)(११) अ.जा.ज.अ.प्र.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास श्री. जोगदंड उप.विभागीय पोलीस अधिकारी भंडारा हे करीत आहेत. सदर गुन्हयातील आरोपीला अटक करण्यात आली.

**४) शुल्लक कारणावरून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून मारहान केली. :—**

दिनांक १८/०६/०१६ रोजी २२.१५ वा. दरम्यान फिर्यादी गौरव रूपचंद बडवाईक वय २३ वर्ष, रा. शिवनगर ज्ञानेश्वर मंदिरा जवळ तुमसर याच्या मातोश्री कॉम्पलेक्स श्रीराम नगर तुमसर येथील दुकानात जावुन दोन्ही आरोपीतांनी सिगारेट मागितली. फिर्यादीने सिगारेट नाही आहे असे म्हणताच आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादिला अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन थापडबुक्यांनी मारहाण केली. असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २९४,३२३,५०४,३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास सफौ. शहारे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**५) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून धमकी दिली. :—**

दिनांक १८/०६/०१६ रोजी २२.१५ वा. दरम्यान फिर्यादी सुभाष बाजीराव राऊत वय ३९ वर्ष, रा. मोहरणा पोलीस पाटिल हे त्यांच्या नातेवाहीकाकडे जेवण करण्यास गावातल्या सार्वजनिक बाजार चौकातुन जात असतांना आरोपीने फिर्यादीला आवाज देवुन थांबवुन ''तु माझ्या अर्जाचा निकाल लावुन दिला नाही.'' असे बोलला यावर फिर्यादिने ''उदया सकाळी तंटामुक्तीत पाहु'' असे बोलले तरा ''तु केव्हाचा पोलीस पाटील झाला'' असे बोलुन फिर्यादिला अश्लिल शब्दात शिवीगाळ करून पाहुण घेण्याची धमकी दिली. असे फिर्यादीचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २९४,,५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोना. गि—हेपुंजे पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**६) अवैध दारू अडयांवर धाडी. :—**

दिनांक १९/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. वरठी, तुमसर, अडयाळ व लाखांदुर येथील परीसरातील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन १२ लिटर हातभट्टी दारू कि. ७२०/—रू. व २३ लिटर ५८० मि.ली. देशी दारू कि. ७,५५०/—रू. असा एकुण कि. ८,२७०/—रू. चा माल जप्त करण्यात आला.

**(के.एच.धात्रक)**
**प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा.**
**दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.